संं.फौ.प्र.क्र.३६५/२०१९ निशाणी क्र.५२

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन**

नाव – गोविंद ज्ञानदेव वाळुंज वय – ३४ वर्षे

राहणार – निमगाव, भोजापूर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

प्र.१ तुम्हाला विचारण्यात येणा–या प्रश्नांची उत्तरे देण्यास तुम्ही बांधील नाही, जर प्रश्नाचे उत्तर चुकले तर त्यासाठी तुम्हाला कोणतीही शिक्षा होणार नाही, पण तुम्ही दिलेली उत्तरे ही विचारात घेतली जातील, हे समजले काय ?

उत्तर होय

प्र.२ साक्षीदार क्र.१ फिर्यादी सुरज संजय कासार यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ३०.०३.२०१९ रोजी त्यांचे गावामध्ये सप्ताह असल्याने ते, त्यांचे वडील संजय राधाकिसन कासार व त्यांची आजी शांताबाई राधाकिसन कासार असे मिळून त्यांचे चुलते रामनाथ राधाकिसन कासार यांचे पॅशन–प्रो मोटारसायकल वरून जात असताना त्यांच्या मोटारसायकलीचा अपघात झाला. त्या अपघातामुळे त्यांच्या पायाला दुखापत झाली होती. त्यांच्या आजीच्या हाताला दुखापत झाली होती. पिंपळगाव नाकविंदा येथील मारुती काळे यांनी त्यांना उचलले. त्यांनी त्यांच्या घरातील लोकांना बोलावून घेतले. तो अपघात शेरणखेल ते पिंपळगाव या रस्त्यावर झाला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.३ तुम्हाला शपथेवर जबाब द्यायचे आहेत काय ?

उत्तर नाही.

प्र.४ तुम्हाला साक्षीदार तपासावयाचे आहेत काय ?

उत्तर नाही.

प्र.५ तुम्हाला केसबद्दल आणखी काही सांगावयाचे आहे काय ?

उत्तर माझ्याविरुद्ध खोटी केस दाखल केली आहे.

आरोपी

समक्ष

(डी.एम.हिंगलजकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले

दिनांक – ०४.०४.२०२६

## प्रमाणपत्र

वर नमूद आरोपीचा जबाब माझे समक्ष त्याच्या सांगणेप्रमाणे खरा व बरोबर नोंदविणेत आला आहे.

समक्ष

(डी.एम.हिंगलजकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले

दिनांक – ०४.०४.२०२६